## //सुविचार

प्रत्येक गोष्ट आपल्याला हवी तशी मिळत नसते म्हणून सुख न शोधता समाधान शोधा, आयुष्य खुप आनंदात जाईल. //

## खेळानंतर स्नॅक्सचे सेवन मुलांसाठी घातक

अनेक मुले खेळून आल्यानंतर जास्त स्नॅक्स सेवन करतात, त्यांच्यात त्यामुळे अनावश्यक उष्मांक वाढतात. परिणामी त्यांना आवश्यक असलेला आरोग्यावरील परिणाम साध्य होताना दिसत नाही, त्यानंतर मग आहारात बदल करण्याची वेळ येते, असे एका संशोधनात दिसून आले आहे. 'अमेरिकन जर्नल ऑफ हेल्थ बिहेविअर' या नियतकालिकात म्हटले आहे की, मुलांमध्ये खेळत असताना प्रत्येक खेळातून १७० उष्मांक जाळले जातात. हे खरे असले तरी खेळानंतर मुले अंदाजे २१३ उष्मांक घेतात. शाळेत खेळानंतर मुले दमतात व त्या नादात ते जास्त स्नॅक्स सेवन करतात. तरुणांच्या क्रीडा स्पर्धा, वाढदिवस यात स्नॅक्स सेवन करण्याची संस्कृतीच अमेरिकेत रूढ आहे, असे ब्रिगहॅम यंग विद्यापीठाच्या प्रमुख संशोधक लोरी स्प्रुअन्स यांचे म्हणणे आहे. खेळून आल्यानंतर मुलांनी गोड पदार्थ सेवन केल्याने त्यांच्यात उष्मांक वाढतात. या संशोधनानुसार तिसरी-चौथीतील मुले फुटबॉल, फ्लॅग फुटबॉल, बेसबॉल, सॉफ्टबॉल खेळतात. त्यांचे हे खेळ शारीरिक व्यायाम देणारे असले तरी नंतर ते उष्मांक वाढवणारे स्नॅक सेवन करतात त्यामुळे हवा तो परिणाम साध्य होत नाही. आईवडीलच या मुलांना ८० टक्के वेळा स्नॅक्स घेऊन देतात. ९० टक्के वेळा गोड शीतपेयेही घेऊन देतात, त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो. संशोधकांच्या मते खेळानंतरच्या स्नॅक्समधून २६ ग्रॅम साखर पोटात जाते. यात साखरयुक्त शीतपेये व इतर पेये मोठी घातक ठरतात. मुलांनी वयाच्या पाचव्या वर्षांपासून साठ मिनिटे तरी खेळले पाहिजे. त्याबरोबर जर उष्मांक अतिरिक्त वाढत असतील तर ते घातक आहे त्यामुळे मुलांना स्नॅक्स देताना ते विचारपूर्वक दिले पाहिजेत.



## अशा पद्धतीने घरीच तयार करा फाऊंडेशन पावडर

**सध्या** लग्नसराईचा काळ सुरू आहे. आज कोणा मैत्रिणीचा साखरपुडा आहे तर उद्या मित्राचं लग्न. घरातही कोणत्या ना कोणत्या नातेवाईकाचे लग्न असतेच. या सगळ्यात प्रत्येक वेळी पार्लरमध्ये जाऊन मेकअप करणं परवडणारं असतंच असं नाही.





अनेकदा फाऊंडेशन, काजळ, लिपस्टिक आणि आयलायनर लावूनही मुली सुंदर दिसतात. पण तुम्हाला माहीत आहे का बाजारात मिळणारे फाऊंडेशन तुम्ही अगदी काही मिनिटांत घरच्या घरी करू शकता. तुम्ही हजारो रुपये महागड्या फाऊंडेशनसाठी खर्च करता का? तुम्ही जे महागडे मेकअपचे साहित्य वापरता त्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या गोष्टी या त्वचेसाठी हानीकारक असतात. पण हेच मेकअपचे साहित्य जर तुम्हाला घरी तयार करता आले तर? चला तर मग घरच्या घरी फाऊंडेशन पावडर कसे तयार केले जाऊ शकते ते वाचू..

**साहित्य :**

- ऑलीव ऑईल
- जोजोबा ऑईल
- बदामाचे तेल
- चेहऱ्याला लावायची पावडर
- कोको पावडर

**कृती :**

चेहऱ्याला लावायच्या पावडरमध्ये कोको पावडर, ऑलीव ऑईल, जोजोबा ऑईल, बदामाचे तेल योग्य प्रमाणात टाका. हे मिश्रण जास्त जाड ही नको आणि जास्त पातळ ही नको. तयार झालेली पावडर बॉक्समध्ये टाकून सेट करा. १० मिनिटांत तयार आहे घरच्या घरी फाऊंडेशन पावडर.

## ब्राऊन राईस खा आणि निरोगी राहा

**तुम्हाला भात मनापासून आवडत असेल, पण वजन वाढेल या भीतीने तुम्ही तुमच्या आवडत्या अन्न पदार्थांपासून लांब राहत असाल, तर आता तुम्हाला तुमचा मोह आवरण्याची जरासुद्धा गरज नाही. तुम्ही तुमच्या आहारामध्ये ब्राऊन राईस समाविष्ट करा आणि वजन वाढेल याची काळजी न करता भाताचे सेवन करा. ब्राऊन राईस म्हणजे नक्की काय, तर पॉलिश न केलेल्या, अन-रिफाइन्ड तांदळाला ब्राऊन राईस असे म्हटले जाते. तांदळाच्या दाण्याला सालीची दोन ते तीन आवरणे असतात. ब्राऊन राईस तयार करण्यासाठी तांदळावरील केवळ सर्वात बाहेरची, जाडसर असलेली साल काढली जाते. बाकीच्या पातळ साली तांदळावर तशाच ठेवल्या जातात, म्हणूनच हा तांदूळ दिसायला 'ब्राऊन', म्हणजेच भुरकट रंगाचा दिसतो. पांढरा तांदूळ तयार होताना त्यावरील सर्वच सालींची आवरणे काढून टाकली जातात, त्यामुळे तो तांदूळ शुभ्र पांढरा दिसतो. पण पांढऱ्या तांदळामध्ये केवळ स्टार्च असतो.**

**ब्राऊन** राईस आणि पांढऱ्या तांदळामध्ये कॅलरीज आणि कर्बोदकांचे प्रमाण जरी एकसमान असले, तरी पांढरा तांदूळ बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये, त्यामध्ये असलेले बी३, बी१, बी६, ही जीवनसत्त्वे, मॅग्नेशियम, फॉस्फरस, लोह, फायबर आणि फॅटी ॲसिड्स ही पोषक तत्त्वे पूर्णतः नष्ट होऊन जातात. त्यामुळे पांढऱ्या तांदळापेक्षा ब्राऊन राईसचे सेवन आरोग्यास अधिक हितकारी असल्याचे आहारतज्ज्ञांचे म्हणणे आहे.



ब्राऊन राईस मध्ये कर्बोदके, प्रथिने, फायबर, मॅग्नेशियम, थियामीन, फॉस्फरस, पोटॅशियम इत्यादी महत्त्वपूर्ण पोषक तत्त्वे असून, याचे सेवन शरीराच्या आरोग्यासाठी अतिशय फायद्याचे आहे. ब्राऊन राईसमध्ये फायबर मोठ्या प्रमाणावर असून, यामुळे रक्तामधील घातक कोलेस्टेरोलचे प्रमाण कमी होते. तसेच रक्तामधील शुगर नियंत्रित होते.

त्यामुळे मधुमेह असणाऱ्यांना याच्या सेवनाने विशेष फायदा मिळतो. फायबरचे प्रमाण यामध्ये जास्त असल्याने भूक शमते, तसेच अन्नाचे पचन व्यवस्थित होते. त्यामुळे बद्धकोष्ठ किंवा पचनाशी निगडित इतर समस्या दूर होतात.

फायबरमुळे कोलोन आणि पचनेन्द्रियाचे कार्य सुरळीत ठेवण्यास मदत होते व कोलेस्टेरोलचे प्रमाण नियंत्रित राहिल्याने हृदयाचे आरोग्यदेखील चांगले राहते.

ब्राऊन राईसमध्ये असलेल्या सेलेनियम आणि फेनोल्स या तत्त्वांमुळे कोलोन कॅन्सर होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो. तसेच ही तत्त्वे थायरॉइड ग्रंथीचे कार्य नियंत्रित करण्यास सहाय्यक आहेत. यामध्ये असलेले मॅग्नेशियम हाडांच्या आरोग्यासाठी चांगले असून, त्यामुळे नर्व्हस सिस्टमही चांगली राहते. शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास देखील ही सर्व तत्त्वे सहाय्यक आहेत. यामध्ये असलेल्या फायबरमुळे पोट खूप काळ भरलेले राहते. त्यामुळे भूक लागणे कमी होऊन, वारंवार काही ना काही खात राहण्याचे प्रमाण कमी होते. परिणामी वजन घटण्यास मदत होते.

## आरोग्यासाठी लिंबाचे फायदे

**लिंबू** हे फळ आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत उपयोगी आहेच, पण त्याशिवाय त्वचेच्या सौंदर्यासाठी देखील याचा वापर करण्याची पद्धत फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. लिंबाचा सुवास हा मन प्रफुल्लित करणारा आहे. किंबहुना मन उदास असताना लिंबाचा सुवास मनाला प्रसन्नता देणारा असल्याचे तज्ज्ञ म्हणतात. लिंबामध्ये जीवाणू प्रतिरोधक तत्त्वे आहेत. लिंबाचा रस हा केवळ त्वचेसाठी नाही, तर केसांच्या उत्तम आरोग्यासाठीही उपयुक्त आहे. लिंबाचा रस त्वचेवर लावल्याने त्यामुळे चेहऱ्यावरील काळे डाग, मुरुमे, पुटकुळ्या आणि इतर समस्या कमी होण्यास मदत होते. लिंबाच्या फोडी गुडघ्यांवर किंवा कोपरांवर चोळल्यास तेथील काळसरपणा आणि कोरडेपणा दूर होऊन तेथील त्वचा मुलायम होण्यास मदत होते. नखांवर आलेला पिवळेपणा हटवण्यासाठीही लिंबाचा रस उपयुक्त आहे. लिंबाचा रस संधिवात आणि पचनाशी निगडित समस्या दूर करण्याच्या उद्देशाने उपयुक्त आहे. तसेच ज्यांना किडनीशी निगडित विकार असतील, त्यांच्यासाठी लिंबाच्या रसाचे पाण्यामध्ये मिसळून केले गेलेले सेवन उपयुक्त ठरते.



या रसाच्या नियमित सेवनाने मलेरिया आणि कॉलरासारख्या रोगांची प्रतिकारशक्ती शरीरामध्ये निर्माण होत असते. लिंबामध्ये 'क' जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणावर असून, यामध्ये 'इ' आणि 'अ' जीवनसत्त्वे, तांबे, क्रोमियम आणि भरपूर प्रमाणात अँटी ऑक्सिडंट्स असतात. लिंबाच्या फोडी रात्री झोपताना झोपण्याच्या खोलीमध्ये ठेवल्याने खोलीतील हवा जंतुमुक्त होते, तसेच खोलीमध्ये लिंबाचा मन प्रसन्न करणारा सुवासही दरवळत राहतो. रात्री झोपण्यापूर्वी लिंबाच्या फोडी झोपण्याच्या खोलीमध्ये ठेवल्या गेल्यास सर्दी-पडसे किंवा एखादी ॲलर्जी लवकर बरी होण्यास मदत होते.

## अनेक गुणांचा खजिना : काकडी

जगामध्ये सर्वप्रथम ज्या भाज्या पेरल्या आणि उगवल्या गेल्या त्यामध्ये काकडी या फळभाजीचा समावेश आहे. काकडीची पैदास भारतामध्ये सर्वात आधी उत्तर भारतामध्ये सुरू झाली. वर्तमान काळामध्ये संपूर्ण जगामध्ये मोठ्या प्रमाणावर उगवल्या जाणाऱ्या भाज्यांमध्ये टोमॅटो, कांदे आणि फुलकोबी पाठोपाठ काकडीची पैदास सर्वात जास्त होत असते. अनेक जीवनसत्त्वे आणि क्षार यांनी परिपूर्ण असलेली ही फळभाजी आजकालच्या काळामध्ये 'सुपर फूड'च्या श्रेणीपर्यंत येऊन ठेपली आहे.



**काकडी** हा एक लो कॅलरी अन्नपदार्थ असून, शंभर ग्रॅम काकडीमध्ये केवळ पंधरा कॅलरीज आहेत. वजन कमी करण्याची इच्छा असणाऱ्यांनी काकडीचा समावेश आपल्या आहारामध्ये अवश्य करायला हवा. यामध्ये अ, बी१, बी६, क ही जीवनसत्त्वे असून, काकडी पोटॅशियमचीदेखील उत्तम स्रोत आहे. शंभर ग्रॅम काकडीमध्ये सुमारे १४७ ग्रॅम पोटॅशियम असते, त्यामुळे याच्या सेवनाने रक्तदाब नियंत्रित होण्यास मदत मिळते. हृदयाच्या स्वास्थ्यासाठी देखील काकडीचे सेवन करणे चांगले.

काकडीमध्ये ९५ टक्के पाणी असल्याने याच्या सेवनाने शरीरामध्ये पाण्याची कमतरता होत नाही. तसेच यामुळे शरीराचे तापमान देखील नियंत्रित राहण्यास मदत होते. काकडीमध्ये अनेक रोगोपचारक गुण आहेत. यामध्ये असलेले पॉलीफेनोल्स अनेक तऱ्हेच्या कर्करोगांपासून शरीराचा बचाव करण्यास सक्षम आहेत. काकडीमध्ये पाणी आणि फायबर मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे याच्या सेवनाने शरीरातील घातक पदार्थ बाहेर टाकले जाऊन शरीराची पचनक्रिया सुरळीत राहते. काकडीचा रस दररोज घेतल्याने गॅसेस, ॲसिडिटी, छातीत जळजळ अशा अपचनाशी निगडित तक्रारींना आळा बसतो. काकडी सिलीकाचे उत्तम स्रोत आहे. सिलीकामुळे शरीरातील कनेक्टिव्ह टिश्यू बळकट होतात. मधुमेहाच्या रुग्णांसाठी काकडीच्या रसाचे सेवन विशेष फायद्याचे आहे. काकडीमध्ये अँटी ऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणावर असून काकडी त्वचेकरिता देखील चांगली आहे. काकडीमधील ॲस्कॉर्बिक ॲसिड आणि 'क' जीवनसत्त्वामुळे शरीरामध्ये कोलाजेनचे निर्माण होऊन त्यामुळे त्वचा सुंदर 'ब' नितळ दिसू लागते. तसेच याच्या नियमित सेवनाने केसांचे आरोग्यदेखील चांगले राहते. काकडी विकत घेताना नेहमी गडद हिरव्या रंगाची काकडी निवडावी. सालांवर डाग असलेली, हाताला नरम लागणारी आणि जाडसर दिसणारी काकडी घेऊ नये. काकडी फ्रीजमध्ये स्टोअर करावी, मात्र कोणत्याही प्रकारची फळे काकडीजवळ ठेवू नयेत, अन्यथा काकड्या लवकर पिवळ्या पडतील व त्यांची गुणवत्तादेखील कमी होईल.

## दीपिका होणार आई



बाफ्टा पुरस्कार सोहळ्यातील दीपिकाचे फोटो आणि व्हिडीओ पाहिल्यानंतर तिच्या प्रेग्नन्सीची चर्चा सोशल मीडियावर होऊ लागली. द वीकच्या रिपोर्टमध्ये दीपिका पदुकोण गर्भवती असल्याचा दावा करण्यात आला आहे. याआधी देखील दीपिकाच्या प्रेग्नन्सीच्या चर्चा सोशल मीडियावर झाली. 'फायटर' चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान दीपिकाच्या प्रेग्नन्सीची सोशल मीडियावर चर्चा सुरु झाली. मात्र, यावर दीपिका किंवा रणवीरने कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. काही दिवसांपूर्वी दीपिका एका मुलाखतीमध्ये म्हणाली होती, रणवीर आणि मला लहान मुले खूप आवडतात. आम्ही त्या दिवसाची वाट पाहत आहोत जेव्हा आमच्या कुटुंबात एका नव्या सदस्याची एन्ट्री होईल.

## 'चला हवा येऊ द्या'ची महत्त्वाची धुरा सांभाळणारा अभिनेता सोडणार कार्यक्रम

गेल्या ९ वर्षांपासून मराठी रसिक प्रेक्षकांना खळखळून हसवणारा कार्यक्रम चला हवा येऊ द्या अजूनही मनोरंजन करत आहे. चला हवा येऊ द्या या कार्यक्रमातून अनेक कलाकारांना अधिक लोकप्रियता मिळाली. भाऊ कदम, कुशल बद्रिकेपासून ते स्नेहल शिदमपर्यंत सर्वच कलाकार या कार्यक्रमामुळे महाराष्ट्राच नाहीतर जगभराच्या कानाकोपऱ्यात पोहोचले. या चला हवा येऊ द्या या कार्यक्रमाने एक वेगळी ओळख कलाकारांना दिली. अशा या लोकप्रिय कार्यक्रमातून एका महत्त्वाच्या कलाकाराची एक्झिट होणार आहे. चला हवा येऊ द्या कार्यक्रमात विविधांगी भूमिका साकारणारा, कॅप्टन ऑफ द शीप म्हणजे अभिनेता निलेश साबळे प्रेक्षकांचा निरोप घेणार आहे. यामागचं कारणही त्याने स्पष्ट केलं आहे. निलेश म्हणाला, चला हवा येऊ द्या हा कार्यक्रम मी सोडला असल्याची चर्चा आहे. कार्यक्रम सध्या चार-पाच महिन्यांच्या गॅपवर चालला आहे. चॅनलने ठरवलं तर कार्यक्रम पुन्हा सुरू होऊ शकतो. पण तब्येतीच्या कारणाने मी थोडेदिवस मी कार्यक्रमातून बाहेर असेल. तेव्हापासून हा कार्यक्रम प्रेक्षकांना खळखळून हसवण्याचं काम करत आहे. सुरुवातीला या कार्यक्रमाला प्रेक्षकांच्या भरघोस प्रतिसाद मिळाला. त्यानंतर अनेक पर्व आणि विविध उपक्रम राबवले गेले. पण मध्यंतरी हा कार्यक्रम सुमार होतं चालल्याची प्रेक्षकांची तक्रार होती. तसेच टीआरपी देखील घसरला. त्यामुळेच कार्यक्रम बंद असल्याची चर्चा सुरू झाली.



## दिनविशेष

### २१ फेब्रुवारी

- १८४२: जॉर्ज ग्रीनॉ यांना शिवणाच्या मशिनचे पेटंट मिळाले.
- १८४८: कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंजल्स यांनी साम्यवादाचा जाहीरनामा द कम्युनिस्ट मॅनिफेस्टो प्रकाशित केला.
- १८७८: न्यू हेवन, कनेक्टिकट येथे पहिली टेलिफोन डिरेक्टरी प्रकाशित करण्यात आली.
- १९१५: लाहोर कट - लाहोर, बनारस व मीरत या ठिकाणी सशस्त्र क्रांतिकारी उठाव झाला.
- १९२५: द न्यूयॉर्कर या मासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
- १९७२: सोव्हिएत संघाचे मानवरहित अंतराळयान लुना २० हे चंद्रावर उतरले.
- १९७५: जयश्री गडकर व बाळ धुरी यांचा विवाह झाला.
- २०१३: हैदराबाद मध्ये अनेक बॉम्बस्फोटांमध्ये किमान १७ जण ठार आणि ११९ जण जखमी झाले.
- १८७५: १२२ वर्षे आणि १६४ दिवस जगलेली फ्रेन्च महिला जीन काल्मेंट यांचा जन्म. (मृत्यू: ४ ऑगस्ट १९९७)
- १८९४: वैज्ञानिक डॉ. शांतिस्वरुप भटनागर यांचा जन्म. (मृत्यू: १ जानेवारी १९५५)
- १८९६: हिन्दी साहित्यिक सूर्यकांत त्रिपाठी निराला यांचा जन्म. (मृत्यू: १५ ऑक्टोबर १९६१)
- १९११: अर्थतज्ञ भवतोष दत्ता यांचा जन्म. (मृत्यू: ११ जानेवारी १९९७)
- १९४२: अभिनेत्री जयश्री गडकर यांचा जन्म. (मृत्यू: २९ ऑगस्ट २००८)
- १९४३: ड्रीमवर्क्स चे सहसंस्थापक डेव्हिड गेफ्फेन यांचा जन्म.
- १९७०: ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू मायकेल स्लॅटर यांचा जन्म.
- १८२९: कित्तूरची राणी चन्नम्मा यांचे निधन. (जन्म: २३ ऑक्टोबर १७७८)
- १९६५: कृष्णवर्णीयांच्या हक्कांसाठी लढणारे अमेरिकन नेते माल्कम एक्स यांचे निधन. (जन्म: १९ मे १९२५)
- १९७५: चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते व दिग्दर्शक गजानन हरी तथा राजा नेने यांचे निधन. (जन्म: १८ सप्टेंबर १९१२)
- १९७७: साहित्य मीमांसक, कवी व विचारवंत रा. श्री. जोग यांचे निधन. (जन्म: १५ मे १९०३)

## भविष्य

**मेष** — पौर्णिमा कालावधीत शुभ घटना घडतील. ज्या वेळी सर्व दिवसांचा कालावधी चांगला असतो त्या वेळी मार्ग मिळतो .

**वृषभ** — बऱ्याच दिवसांतून मनावर कोणताही ताण येणार नाही असे वातावरण या आठवडयात आहे. म्हणजेच सर्व दिवस उत्तम असतील.

**मिथुन** — सर्व दिवस चांगले असतील. त्यामुळे दुसऱ्याने काम करावे ही अपेक्षाच राहणार नाही. स्वतःचे काम स्वतः करण्यामध्ये आनंद मिळेल.

**कर्क** — व्यापारी वर्गाला दिलासा मिळेल. नोकरदार वर्गाचा कामातील उत्साह टिकून राहावा असे वाटत असेल तर वरिष्ठांशी सल्लामसलत करा. भावंडांशी संवाद साधाल.

**सिंह** — आर्थिक व्यवहार मार्गी लागतील. राजकीय क्षेत्रात जबाबदारीतून मुक्तता मिळेल. नातेवाईकांशी कार्यक्रमानिमित्त भेटीगाठी होतील. धार्मिक कार्यासाठी खर्च कराल.

**कन्या** — तुम्ही जे निर्णय घ्याल त्या निर्णयाला यश मिळेते. तेव्हा आता कोणतेही निर्णय घ्यायला उशीर करू नका. व्यवसायात यशस्वी वाटचाल राहील. घरगुती वातावरण आनंदी राहील.

**तुला** — नोकरदार वर्गाच्या कामातील तांत्रिक अडचणी कमी होतील आर्थिक बाबतीत समाधानी राहाल. राजकीय क्षेत्रात पाऊल ठेवायचे नाही म्हटले तरी ठेवावे लागेल. त्यामुळे प्रतिष्ठा वाढेल.

**वृश्चिक** — जोडीदाराकडून गोड बोलून कामे करून घ्याल. धार्मिक गोष्टीत सहभाग राहील. प्रकृती ठणठणीत राहील. शेजाऱ्यांची मदत करावी लागेल. हाती घेतलेले काम पूर्ण कराल.

**धनु** — चांगल्या दिवसांमध्ये नवीन काही बदल करावयाचे असल्यास करा. कारण कोणत्याही कामासाठी संघर्ष करावा लागणार नाही. अगदी वेळेत ठरवल्याप्रमाणे कामे होत राहतील.

**मकर** — आळस बाजूला सारा. उद्याचे कामही आज कसे करता येईल, या दृष्टीने प्रयत्न वाढवा. व्यवसायात विस्कळीत झालेली घडी सुरळीत होईल. आर्थिकदृष्ट्या बचत करा.

**कुंभ** — दोन दिवस म्हणजे तारेवरची कसरत आहे असे म्हणायला हरकत नाही. या दिवसांत पळापळ होणार आहे. न जमणाऱ्या कामाची जबाबदारी घेऊ नका. भावनिक गोष्टींपेक्षा व्यावहारिक गोष्टींना महत्त्व द्या. एखादी गोष्ट नाही पटली तर सोडून द्या.

**मीन** — व्यवसायातून मिळणारे उत्पन्न चांगले असेल. नोकरदार वर्गाला नवीन कामाचे प्रस्ताव येतील. खर्च सांभाळण्याचा प्रयत्न करा. मैत्रीच्या नात्यातील सलोखा वाढेल. मुलांची प्रगती होईल. घरगुती वातावरण चांगले राहील. जोडीदाराचे कौतुक कराल.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - १२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | | | 6 | | | 9 | 8 | 7 |
| | 2 | | | | | | | 4 |
| | 9 | 1 | | 3 | | | | 6 |
| | 5 | 2 | | 6 | | | 7 | |
| 1 | 6 | 9 | | | 7 | 5 | | |
| 3 | | 7 | 9 | | | 8 | | |
| | | | 7 | 1 | 5 | 6 | | |
| | 1 | | 2 | | 6 | | 3 | |
| | | | | | 8 | | 4 | |

### उत्तर सुडोकू -११

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 9 | 4 | 6 | 1 | 5 | 3 | 7 | 8 |
| 5 | 3 | 7 | 9 | 2 | 8 | 1 | 4 | 6 |
| 6 | 8 | 1 | 4 | 3 | 7 | 9 | 2 | 5 |
| 7 | 6 | 5 | 1 | 4 | 9 | 2 | 8 | 3 |
| 9 | 1 | 2 | 5 | 8 | 3 | 4 | 6 | 7 |
| 8 | 4 | 3 | 2 | 7 | 6 | 5 | 9 | 1 |
| 1 | 2 | 8 | 3 | 6 | 4 | 7 | 5 | 9 |
| 3 | 5 | 6 | 7 | 9 | 2 | 8 | 1 | 4 |
| 4 | 7 | 9 | 8 | 5 | 1 | 6 | 3 | 2 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# लेह-लडाखही लटकले... ?



राजधानी दिल्लीत शेतकरी आंदोलन, भाजपचे पुढील हजार वर्षांच्या रामराज्याचा एल्गार करणारे अधिवेशन इत्यादींच्या धबडग्यात सोमवारी एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत काय झाले याचा पूर्ण तपशील अद्याप उपलब्ध नाही. तसा तो नसला तरी ज्या विषयावर ही बैठक केंद्रास बोलवावी लागली तो मुद्दा महत्त्वाचा आहे. याचे कारण गेले काही महिने त्या भागात जे काही सुरू आहे त्याकडे जवळपास संपूर्ण देशाचे दुर्लक्ष झालेले आहे. देशाच्या सीमावर्ती भागांतील खदखदीकडे सतत काणाडोळा करणे हे तसे आपले वैशिष्ट्यच. मग तो प्रदेश म्यानमारच्या सीमेवरील मणिपूर असो वा चीनशी भौगोलिक साहचर्य असणारे लेह-लडाख असो. या परिसरांतील अस्वस्थतेची दखल मध्यवर्ती माध्यमे पुरेशा प्रमाणात घेत नाहीत आणि त्यामुळे या परिसरांतील अस्थैर्याचे वास्तव नागरिकांस उमजू शकत नाही. लेह- लडाख- कारगिल भागांबाबत हे सत्य पुरेपूर लागू पडते. गेले काही आठवडे त्या परिसरांत रहिवाशांचे लाखा-लाखांचे मोर्चे निघाले. त्यास ना वाहिन्यांनी प्रसिद्धी दिली ना महत्त्वाच्या वर्तमानपत्रांच्या प्रथम पृष्ठांवर त्यास स्थान मिळाले. या मोर्चेक ्यांच्या प्रमुख मागण्या अत्यंत साध्या म्हणाव्यात अशा आहेत. लेह- लडाख- कारगिल या परिसरास स्वतंत्र राज्याचा दर्जा हवा, तो लगेच देता येत नसेल तर केंद्रशासित प्रदेशात स्वत:ची प्रतिनिधीसभा हवी आणि तूर्त या प्रदेशातून फक्त एकच लोकप्रतिनिधी संसदेत जातो; त्यात आणखी एकाची भर हवी. या मागण्यांस त्या प्रांतातील नागरिकांचा इतका व्यापक पाठिंबा आहे की एरवी अशा विषयांकडे आणि प्रदेशांकडे दुर्लक्ष करणा ्या केंद्र सरकारलाही या आंदोलनांची दखल घ्यावी लागली. ताजी बैठक ही त्यासाठीच. तिचे महत्त्व यापेक्षाही अधिक आहे. याचे कारण या परिसरातील १४ संघटना, पक्ष इत्यादींचे संयुक्त कृती दल सदर मागणीच्या पाठपुराव्यासाठी स्थापन करण्यात आले असून त्यात सर्वपक्षीय- भाजपसह- सदस्यांचा समावेश आहे. आंदोलकांचा हा आक्रोश आजचा नाही. तर जम्मू-काश्मीर परिसरास लागू असलेले अनुच्छेद ३७० रद्द केल्यापासूनचा आहे. वास्तविक त्या घटनेचे लेह-लडाख परिसराने स्वागत केले. कारण वांशिक, सांस्कृतिक आणि धार्मिकदृष्ट्याही स्वतंत्र असलेल्या या प्रदेशाचे भागधेय जम्मू-काश्मीरशी बांधणे अयोग्य होते. ती चूक २०१९ च्या ऑगस्ट महिन्यात दूर झाली. ते ठीक. पण त्यानंतर लेह- लडाख- कारगिल प्रदेशास जे देणे केंद्राने अपेक्षित होते तेही नाकारले जाते. म्हणजे राजकीय अस्थैर्य म्हणून जम्मू-काश्मिरात निवडणुका नाहीत आणि राजकीय स्थैर्य असूनही लेह- लडाख- कारगिलातही निवडणुका नाहीत, हे कसे? केंद्र जम्मू-काश्मीरप्रमाणे आपल्यालाही वाटाण्याच्या अक्षता लावते आहे हे लक्षात आल्यावर या प्रदेशातील अस्वस्थता वर येऊ लागली. त्यामुळेच जम्मू-काश्मीरच्या जोखडातून सुटल्याचा या प्रदेशाचा सुरुवातीचा उत्साह २०२१ पासून मावळू लागला आणि स्थानिकांची खदखद व्यक्त होऊ लागली. ती फक्त राज्याचा दर्जा नाही, प्रतिनिधीसभा नाही इतक्यापुरतीच नाही. त्यापेक्षा किती तरी व्यापक आयाम या नाराजीस आहे. उदाहरणार्थ रोजगारनिर्मिती, गुंतवणूक, आर्थिक स्वायत्तता, स्थानिकांचा संपत्तीचा विशेषाधिकार अशा एकाही मुद्द्यावर केंद्राने या प्रदेशास दिलेले आश्वासन अद्याप पाळलेले नाही. हळूहळू स्थानिकांच्या तीव्र भावना व्यक्त होऊ लागल्या. ठिकठिकाणी मोर्चे निघाले, उपोषणे झाली. पण केंद्र मात्र ढिम्म. अखेर गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात केंद्राने या संदर्भात पहिल्यांदा लेह- लडाख- कारगिलवासीयांचे म्हणणे ऐकून घेतले. त्या बैठकीत लेह- लडाख- कारगिलवासीयांच्या सर्वपक्षीय समितीने आपले म्हणणे केंद्रास लेखी सादर केले. पण नंतर प्रतिसाद शून्य. अखेर ३ फेब्रुवारी रोजी लेह- लडाख- कारगिल बंद पाळला जाईल असे जाहीर झाल्यानंतर केंद्रास पुन्हा जाग आली आणि २ फेब्रुवारी रोजी चर्चेच्या पुढच्या फेरीचे आश्वासन दिले गेले. ही चर्चा १९ फेब्रुवारीस ठरली. तथापि केंद्राच्या आश्वासनांचा एव्हाना पुरेपूर अनुभव आलेल्या लेह- लडाख- कारगिलवासीयांनी ३ फेब्रुवारीचा नियोजित बंद कडकडीतपणे आणि उत्स्फूर्तपणे पाळला. ही पार्श्वभूमी लक्षात घेतल्यानंतर त्यांच्या मागण्यांविषयी. यातील अत्यंत महत्त्वाची मागणी आहे ती राज्यघटनेच्या सहाव्या परिशिष्टा तील समावेशाविषयी. हा प्रदेश ऑगस्ट २०१९ पर्यंत जम्मू-काश्मीरचा भाग होता आणि त्यामुळे त्या प्रांतांच्या विशेष दर्जाचा लाभ या परिसरासही मिळत होता. पण जम्मू-काश्मीरसाठीचे अनुच्छेद ३७० रद्द झाले आणि या प्रांतानेही आपला विशेषाधिकार गमावला. याचबरोबर या भागातील नागरिकांचा स्थावर मालमत्तेवरील विशेष मालकी हक्कही गेला आणि स्थानिक रोजगारावरील दावाही त्यांनी गमावला. या बदल्यात मिळाले काय? तर काही नाही. जम्मू-काश्मीरने ३७० संरक्षण गमावल्यानंतर पुढच्याच महिन्यात सप्टेंबर २०१९ मध्ये राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगा ने लडाखच्या केंद्रशासकीय प्रदेशाचा समावेश सहाव्या परिशिष्टा त करण्याची शिफारस केली. यात समावेश झाल्यास स्थावर मालमत्तेचा आणि स्वायत्ततेचा हक्क घटनेनुसार दिला जातो. ही बाब स्थानिकांसाठी अत्यंत महत्त्वाची. कारण एकट्या लडाख प्रदेशात ९७ टक्के नागरिक हे अनुसूचित जमाती त मोडतात.

# नवभारताचे भवितव्य डिजिटल नि उज्ज्वल!



**जसजसा भारत (आणि जग) डिजिटलीकरणाकडे वळत आहे, तसतशा मुळापासून काम करणाऱ्या सक्षम डिजिटल पायाभूत सुविधा सुपरिणाम घडवतील. औद्योगिक क्रांतीनंतर रेल्वे आणि रस्त्यांच्या जाळ्याने जो बदल घडवला, तेवढ्याच महत्त्वाचा हा सकारात्मक बदल असेल. यामुळे अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांची चहूबाजूंनी भरघोस आणि प्रचंड वेगाने वाढ होत असून विकासाच्या संधी निर्माण होत आहेत.**

नवभारताच्या कल्पनेने अलिकडच्या वर्षांत सर्व भारतीयांमध्ये मोठ्या प्रमाणावर आत्मविश्वास आणि आशावाद निर्माण केला आहे. जागतिक आणि प्रादेशिक राजकीय मंचावरील अनेक मुद्द्यांवर आत्मविश्वासपूर्ण, स्वतंत्र भूमिका घेण्याची आपली क्षमता सिद्ध होत आहे. ऑलिम्पिकसह इतर क्रीडास्पर्धांमध्ये मिळवलेले उज्ज्वल यश, चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वीरीत्या (जगात पहिल्यांदाच) बग्गी उतरवणे यासारख्या घटनांमुळे नवभारताच्या उदयाची चाहूल लागली आहे. वेगाने होत असलेल्या डिजिटलीकरणामुळे भारताचे सध्या लक्षणीयरीत्या सुरू असलेले आर्थिक स्थित्यंतर, हे विकसित होत असलेल्या नवभारताचे आणखी एक तेजस्वी उदाहरण आहे.कोविडने जगभरातील देश आणि संस्थांना डिजिटल होण्यास भाग पाडण्यापूर्वी सध्याच्या सरकारने डिजिटल अर्थव्यवस्थेसाठी (आणि डिजिटल डिलिव्हरी मॉडेल अर्थात माहितीच्या डिजिटल आदान-प्रधानासाठीची माध्यमे, यांसाठी) प्रयत्न केले आहेत. डिजिटल इंडिया मिशन या मोहिमेला २०१५ मध्ये सुरुवात झाली आणि भारत सरकारने सुरु केलेल्या सार्वजनिक सेवांच्या वितरणात क्रांती घडून आली. अर्थव्यवस्थेतील विविध घटकांच्या वाढीसाठी फायदेशीर ठरणाऱ्या, भारत स्टॅक या एका अनोख्या मंचाचीदेखील याद्वारे सुरुवात झाली. या मिशनमुळे कृषी, वाहतूक, आरोग्यसेवा आणि शिक्षण यासारख्या महत्त्वाच्या, संवेदनशील आणि गुंतागुंतीच्या उद्योगांमध्ये व्यवसायांचे नवे नमुने-प्रकार उदयाला आले. या सर्वांमध्ये आता मूलभूत परिवर्तनदेखील होत आहे. या डिजिटलीकरणाने व्यवस्थेतली गळती (भ्रष्टाचार) कमी केली आणि अर्थव्यवस्थेचे औपचारिकीकरण (अर्थव्यवस्थेचे सरकार आणि कायद्याद्वारे नियमन) शक्य केले. वाढती जीएसटी (वस्तू सेवा कर) नोंदणी आणि संकलन, हे या यशाचे एक चांगले निदर्शक आहे. स्वतंत्र व्यावसायिक असलेली व्यक्ती आणि उद्योग, सुविधा, तत्परता आणि कार्यक्षमतेसाठी फायदा घेऊ शकत असल्यामुळे, इंडिया स्टॅक हे एक महत्त्वाचे वळण ठरले आहे. या एकंदर संयोजनामुळे व्यवसाय अधिक वेग पकडू शकेल.

जसजसा भारत (आणि जग) डिजिटलीकरणाकडे वळत आहे, तसतशा या अगदी मुळापासून काम करणाऱ्या सक्षम डिजिटल पायाभूत सुविधा सुपरिणाम घडवतील. औद्योगिक क्रांतीनंतर रेल्वे आणि रस्त्यांच्या जाळ्याने जो बदल घडवला, तेवढ्याच महत्त्वाचा हा सुपरिणाम असेल. यामुळे अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांची चहूबाजूंनी वाढ झाली आणि नागरिकांसाठीही नव्या संधी निर्माण झाल्या. जन धन योजना, को-विन, यूपीआय आणि ओएनडीसी ही भारतीय डिजिटलीकरणाची, जागतिक स्तरावर आघाडीची ठरणारी काही उदाहरणे आहेत. व्यापक आर्थिक परिसंस्थेतील वित्तीयसंस्था आणि संघटना, कदाचित भारत स्टॅक चा सर्वात जास्त अवलंब करणाऱ्या आहेत. ज्यामुळे आर्थिक समावेशनाला चालना मिळते आणि आर्थिक उत्पादने (आर्थिक गुंतवणुकीतून संपत्ती निर्मिती करणारी रोखे-बॉंड-म्युच्युअल फंड यांसारखी माध्यमे) स्वीकारण्यात लक्षणीय सहजता येते. उदाहरणार्थ, प्रधानमंत्री जन धन योजने ची खाती मार्च २०१५ मधील १४ कोटी ७२ लाखावरून तीन पटींनी वाढून ऑगस्ट २०२२ मध्ये ४६ कोटी २५ लाख झाली. यात, याआधी कधीही बँकेत खाती नसलेल्या लोकांना मोठ्या प्रमाणात सामावून घेण्यात आले आहे. सरकारचा रेटा डिजिटलीकरणामुळे मिळणाऱ्या वाढत्या संधींना प्रतिसाद म्हणून, आपल्याला, उद्योगांद्वारे विशेषत: BsC डोमेनमध्ये (उद्योग ते ग्राहक या व्यवहार परिघात) इंडिया स्टॅक चा होत असलेला व्यापक वापर पाहायला मिळतो. यामुळे भारतीय नागरिकांना मिळणारे अफाट फायदे अधोरेखित होतात. खरं तर, सरकारचा डिजिटलीकरणासाठीचा प्रयत्न इतका आग्रही आहे की इंटरनॅशनल डेटा कॉर्पोरेशन या आंतरराष्ट्रीय विदा महामंडळाच्या (आयडीसी) अलीकडील डिजिटल व्यवसाय सर्वेक्षणा त (ऑगस्ट २०२३) भारतात २५ टक्के मध्यम ते मोठ्या उद्योगांनी असे म्हटले आहे की, सरकारने धरलेला आग्रह व्यवसायाला डिजिटल स्वरुप देण्यात कारणीभूत ठरला आहे. आयडीसी ने डिजिटल व्यवसाया ची परिभाषा पुढील प्रमाणे केली आहे. असा व्यवसाय, जिथे डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरावर मूल्यनिर्मिती आधारित आहे, ज्यामध्ये अंतर्गत आणि बाह्य प्रक्रियांचा समावेश आहे. एखादी व्यवसायसंस्था, ग्राहक-नागरिक-पुरवठादार आणि भागीदार यांच्याशी कशा प्रकारे व्यवहार करते; आपल्या कर्मचाऱ्यांना कसे आकर्षित करते, त्यांचे व्यवस्थापन कसे करते, आणि आपला कर्मचारी आपल्याला सोडून कसा जाणार नाही, याची काळजी घेते; आणि ती कोणती उत्पादने, सेवा आणि अनुभव प्रदान करते, या गोष्टी या व्यवसायात महत्त्वाच्या असतात.

आपल्या मजबूत विकसक समुदायामुळे आणि माहिती तंत्रज्ञान सेवांमधील पारंपरिक सामर्थ्यामुळे, डिजिटलीकरण आत्मसात करण्यात भारतीय उद्योग मागे नाहीत. आंतरराष्ट्रीय उद्योगबंधूंशी तुलना करता ते तुलनेत फारसे मागे नाहीत, ही बाब लक्षणीय आहे. आयडीसी चे डिजिटल व्यवसाय सर्वेक्षण देखील सांगते की, आज एक तृतीयांशपेक्षा जास्त भारतीय कंपन्यांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) डिजिटल धोरणच राबवतात.डिजिटल कार्यप्रणाली पुढे नेण्यासाठी, आणखी २५ टक्के भारतीय उपक्रमांनी गेल्या दोन वर्षांत चीफ डिजिटल ऑफिसर चीफ डेटा ऑफिसर यांसारखी नवीन पदे निर्माण केली आहेत. व्यवसायाचे डिजिटल स्वरुप, परिचालनात्मक कार्यक्षमता वाढवण्यात मदत करतात, निर्णयक्षमता वाढवतात, स्पर्धात्मक वरचष्मा वाढवतात आणि महत्त्वाचे म्हणजे ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करतात. या सर्व बाबी आता उद्योजकांना-व्यावसायिकांना कळल्या आहेत. हे डिजिटल गारुड केवळ उद्योजक-व्यावसायिकांनीच नव्हे तर भारतीय ग्राहकांनीही ते उत्साहाने स्वीकारले आहे. ८५ कोटी इंटरनेट वर्गणीदार (सबस्क्रायबर्स), १.१ अब्ज मोबाइल ग्राहक (ज्यापैकी ६३ कोटींहून जास्त स्मार्टफोन वापरकर्ते आहेत), आणि ३९ कोटी आठ लाख समाजमाध्यम वापरकर्ते या सर्वांसह भारताची लोकसंख्या आधीपासूनच डिजिटलीकरणाने व्यापली आहे.

आणि लोकसंख्येचा हा मोठा भाग आता डिजिटलीकरणाचा आणखी एक टप्पा म्हणता येईल असा डीजी लॉकर (वैयक्तिक दस्तावेज साठवून ठेवण्याची डिजिटल सेवा) स्वीकारत आहे. डिजी १३ कोटी ७- लाखपेक्षा जास्त वापरकर्ते आहेत. यूपीआयचे ३० कोटी सक्रिय वापरकर्ते आहेत आणि को-विन चे १.१ अब्ज नोंदणीकृत सदस्य आहेत. उद्यम-उद्योग-व्यवसायांनी तसेच ग्राहकांनी सक्रियपणे डिजिटलीकरणाचा अवलंब केल्यामुळे डिजिटलीकरणाच्या दिशेने भारताचे झालेले स्थित्यंतर पुनश्च माघारी न फिरण्याजोगे-न टाळता येण्याजोगे आणि व्यापक आहे. माहिती-तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक्स राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी सांगितले की, डिजिटल अर्थव्यवस्था २०२६पर्यंत भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात २० टक्के योगदान देईल. आयडीसी देखील भारताच्या भविष्यकाळातील वेगवान डिजिटल लाभांविषयी नि:शंक आहे. दोन वर्षांपूर्वी, ३४.८ टक्के भारतीय व्यावसायिकांनी आयडीसी ला सांगितले की त्यांच्या महसुलापैकी ५०% किंवा त्याहून अधिक उत्पन्न, व्यवसायाच्या डिजिटल स्वरुपामधून आले आहे. आज, महसुलाचे हे प्रमाण ५०टक्के, तसेच भारतीय उद्योगांचे प्रमाण ३४.८टक्के आहे आणि येत्या तीन वर्षांत ६२ टक्के भारतीय उद्योग त्यांच्या उत्पन्नापैकी ५० टक्क्यांपेक्षा जास्त उत्पन्न व्यवसायाच्या डिजिटल स्वरुपामधून मिळवतील, अशी आयडीसी ला अपेक्षा आहे. साहजिकच, नवभारताचे भवितव्य डिजिटल नि उज्ज्वल आहे!

# बछड्यांची आईशी भेट घालून देण्यासाठी वनविभागाची शिकस्त



**मुंबई :** संजय गांधी नॅशनल पार्कमधील दोन महिन्यांच्या तीन बछड्यांची त्यांच्या आईपासून ताटातूट झाली आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील अधिकारीदेखील प्रयत्नांची पराकाष्टा करून तिचा शोध घेत आहेत. उद्यान आणि आसपासच्या परिसरात बसवलेल्या विविध कॅमेऱ्यांमधील प्रतिमा स्कॅन करून चोवीस तास मागोवा काढत आहेत. पण अद्याप तरी त्यांच्या प्रयत्नांना यश आलेले नाही. आईपासून हरवून जवळपास आता एक महिना झाला आहे. पण लवकरात लवकर या बछड्यांना आईचे छत्र मिळेल, या आशेने अधिकाऱ्यांनी शोध सुरूच ठेवला आहे. गेल्या महिन्यात १६ जानेवारीला व्यस्त असलेल्या वेस्टर्न एक्स्प्रेस महामार्गापासून अवघ्या २०० मीटर अंतरावर असलेल्या गोरेगावच्या आरे कॉलनी परिसरात म्हशीच्या गोठ्याजवळ असलेल्या आठ फूट खोल रिकाम्या पाण्याच्या टाकीत हे तीन बछडे पडलेले दिसून आले. हे बछडे सापडल्यानंतर त्यांची आईशी भेट घालून द्यायचीच असे ठरवल्याचे वन अधिकारी निकेत शिंदे यांनी सांगितले. आईपासून दुरावलेला या बछड्यांना दूध, चिकन सूप, कच्चे चिकन आणि पाणी देण्यात आले. त्यांनी चिकन फस्त केले पण दुधाला तोंडही लावले नाही, असे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पशुवैद्य डॉ. विनया जंगले यांनी सांगितले. पुढील पाच दिवस, वनविभागाने थेट कोणताही हस्तक्षेप न करता बछड्यांची आई परतण्याची वाट बघितली. आम्ही पाण्याच्या टाकीजवळ कॅमेरा सापळे लावले. बछड्यांचे संरक्षण करण्यासाठी आणि त्याची आई परतत आहे की नाही यावर लक्ष ठेवण्यासाठी आमचे कर्मचारी घटनास्थळापासून दूर तैनात केले. त्याचवेळी घटनास्थळापासून ८ ते १० किमी परिघात १५ कॅमेरा ट्रॅप लावण्यात आले. पाच दिवस आईची वाट बघितल्यानंतर अधिकाऱ्यांनी बछड्यांना पाण्याच्या टाकीपासून थोड्याच अंतरावर एका छोट्या पिंजऱ्यात ठेवून त्यांच्या आईचा शोध घेण्याचा सक्रिय प्रयत्न केला. आई परतली तर लगेच पिंजऱ्याचे दार उघडण्याची तयारी त्यांनी केली होती.

# फऱ्या रोगामुळे तीन जनावरे मृत्युमुखी

## खोडाळ्यात पशुसंवर्धन विभागाची हलगर्जी जनावरांच्या जीवावर, २ गायी अत्यवस्थ

**खोडाळा :** खोडाळा येथील बाळू हमरे यांचे २ बैल, रामु कवर यांचा १ बैल अशा तीन जनावरांचा फऱ्या रोगामुळे मृत्यू झाला आहे. तर विजय अनंता वाघ यांच्या २ गायी अत्यवस्थ आहेत. ही घटना सोमवारी घडली आहे. खोडाळा आणि परिसरात कोणत्याही प्रकारचे लसीकरण झालेले नाही. त्यामुळेच फऱ्या रोगाचा प्रादुर्भाव झाला असून, शेतकऱ्यांच्या जनावरांचे नुकसान होत आहे. पशुसंवर्धन विभागाची हलगर्जी जनावरांच्या जीवावर बेतली आहे.

खोडाळा येथे एकमेव महिला पशुधन विकास अधिकारी कार्यरत आहे. त्यांच्या हाताखाली एकही कर्मचारी नाही. ऑनलाईन रिपोर्टींग, तालुक्यातील मीटिंगमुळे प्रस्तुत अधिकाऱ्यांना मूळ पदावरील सेवा पूर्ण बजावणे शक्य होत नाही. शिवाय एकट्याने लसीकरण करणे दुरापास्त होत असल्याने खोडाळा आणि पंचक्रोशीतील जनावरांचे आरोग्य धोकादायक बनले आहे.



तालुक्यात ५९ महसुली गावे आणि २२२ पाडे आहेत. लोकसंख्येच्या प्रमाणात जित्राबांची संख्या असून प्रत्यक्ष खेड्यापाड्यावर काम करण्यासाठी कर्मचारी नसल्याने आहे त्याच कर्मचाऱ्यांना विस्तारित क्षेत्रात काम करताना जनतेचा रोष पत्करावा लागत आहे. तातडीने येथील अनुशेष भरण्याची मागणी २०२१ पासून होत आहे. २०२१ साली उधळे हट्टीपाडा परिसरात लक्षणीय संख्येने जनावरे दगावली होती. तत्कालीन परिस्थितीत जिल्हा परिषदेने करारावर मानद पशुधन पर्यवेक्षकांची नियुक्ती केली होती.परंतु त्यांचा करार संपला असून, आता तालुक्यातील एकूणच जनावरांचे आरोग्य बाधित झाले आहे. याबाबत मोखाडा पंचायत समितीशी संपर्क साधला येथे कार्यरत असलेले विस्तार अधिकारी डॉ. सचिन भालचिम यांच्याकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. तर खोडाळा पशुधन विकास अधिकारी डॉ. क्षितिजा मोरे यांनी उशिराने याठिकाणी भेट दिली असून, लगोलग लसीकरण मोहीम हाती घेणार असल्याचे मोरे यांनी स्पष्ट केले.

> मोखाडा तालुक्यात पशुसंवर्धन विभागात काही पदे रिक्त आहेत. ही पदे भरून आदिवासींचे पशुधनाला वेळेवर उपचार मिळावेत. आदिवासी बांधवांच्या पशुधनाची काळजी घेण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासन आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी तातडीने योग्य उपाययोजना करून शेतीला एकमेव आधार असलेल्या पशुधनाचे मृत्यू रोखावे.
>
> **– उमेश येलमामे**, उपसरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, खोडाळा

### फऱ्या म्हणजे काय?

ब्लॅक कॉर्टर अर्थात फऱ्या रोग. या रोगात जनावरांच्या नसा सुजतात. आणि हलका ताप येतो. क्वचितप्रसंगी जनावराचे पोट फुगते. परंतु पोट फुगण्याचा प्रकार दुरान्वयानेच पाहायला मिळतो. मात्र ही साथ फऱ्या रोगाची नसल्याची स्पष्टोक्ती डॉ. मोरे यांनी दिली आहे.

Ponzi scam cases

# CBI conducts searches at two locations in Kolkata




**New Delhi :** The CBI is searching two premises, one belonging to Amal Bhattacharya and the other to his company Unix Infrastructure Pvt Ltd, in Kolkata in connection with a 2021 ponzi scam caseThe CBI is searching two premises, one belonging to Amal Bhattacharya and the other to his company Unix Infrastructure Pvt Ltd, in Kolkata in connection with a 2021 ponzi scam case, officials said on Tuesday. The investigation against the company began when its agents approached a deputy magistrate claiming that they have been tasked to raise money from people in the name of selling some plots of land in West Bengal`s Bankura district. The agents alleged that the firm was acting like a non-banking financial company without having any authorisation from the Reserve Bank of India or the government. The deputy magistrate then ordered police to register an FIR, which was later taken over by the CBI on the orders of the Supreme Court to investigate ponzi scam cases.

# US lauds Indian Navy's role in strategic waters in view of Houthi attacks on Cargo ships



**New Delhi:** The US is engaged with India on the issue of alleged failed plot to kill a Sikh separatist and it is looking forward to the findings of the high-level committee appointed by New Delhi to probe the matter, US Deputy Secretary of State Richard Verma said on Tuesday The US is engaged with India on the issue of alleged failed plot to kill a Sikh separatist and it is looking forward to the findings of the high-level committee appointed by New Delhi to probe the matter, US Deputy Secretary of State Richard Verma said on Tuesday. In December, Washington said it thwarted an alleged plot hatched by an Indian agent to kill Sikh separatist Gurpatwant Singh Pannun on American soil. India has already constituted a probe committee to investigate the allegations. "On the issue that was raised, look, we raised our concerns with the government of India. There is a committee of inquiry looking into the matter and we will stay engaged with the government and look forward to their findings and they`ve taken it very seriously. And we`re grateful for that," Verma said. The former US Ambassador to India was responding to a question at an interactive session organised by the Observer Research Foundation (ORF). Delving into various geo-political challenges, he also lauded the Indian Navy`s role in strategic waters in view of attacking Houthi militants attacking various commercial vessels in the Red Sea. We appreciate everything India has been doing in the Red Sea with its Navy and the incredible support that they have provided.

# Three held for 2 murders over water-vending on trains

**Mumbai:** Three individuals were apprehended on Monday for purportedly killing two water vendors and disposing of their bodies in Kasara Ghat and Vaitarna River, according to a police official. The investigation commenced after the discovery of one victim`s body on February 6. Additionally, three suspects, who had fled to Hyderabad after murdering a colleague, were successfully detained by Palghar police. The colleague`s body was discovered in the Vaitarna river on February 3. "The police cracked the case as the victim`s hand had some names tattooed. The victim was identified as




Deepak Thoke, 25. Further probe led to the arrests of Pentya Chittari 38, Saikumar Kadamaachi 22 and Kishore Shetye 29," a Mokhada police station official said. "They confessed to killing Thoke as well as the vendor whose body they had dumped at Kasara Ghat.

The accused and both victims sell mineral water in trains and had a monetary dispute," the police officer added. "The man whose body was found in the Vaitarna river was killed in the house of an accused in Titwala. The Kasara Ghat victim, identified as Rinku Gupta, used to sell water in trains in the Ulhasnagar region. A missing person report was filed in Ulhasnagar police station on February 2. A fourth accused identified as Sagar Telang is on the run, the official said stated.

